


सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

•वर्ष २४ वे • अंक ३०४ • बुधवार दि.२ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# एकनाथ शिंदे आणि सोबतचे नेते म्हणजेच मूळ शिवसेना



## शिंदे गटाचा सर्वोच्च न्यायालयात जोरदार युक्तिवाद

नवी दिल्ली:शिवसेना पक्ष आणि या पक्षाचे निवडणूक चिन्ह कोणाचे? यावर सध्या सुप्रीम कोर्टात जोरदार युक्तिवाद सुरू आहे . ठाकरे गटाने आपली बाजू न्यायालयापुढे मांडली आहे. आता शिंदे गटाचा युक्तिवाद सुरू झाला आहे. ठाकरे गटाने अगोदर न्यायालयापुढे अनेक कागदपत्रे सादर केली आहेत. तसेच निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. दरम्यान, आता शिंदे यांची बाजू मांडणारे वकील नीरज कौल यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेचे पूर्णपणे समर्थन केले आहे. राजकीय पक्षातील फुटीनंतर पक्ष कोणाचा हे आयोग ठरवतो. एकनाथ शिंदे आणि त्यांच्या सोबतचे नेते म्हणजेच मूळ शिवसेना असा युक्तिवाद करत ठाकरे गटाच्या युक्तिवादाचीही चिरफाड केली आहे.

आज सुप्रीम कोर्टात झालेल्या सुनावणीत नीरज किशन कौल यांनी आपल्या युक्तिवादाच्या पहिल्याच दिवशी निवडणूक आयोगाच्या भूमिकेवर मत व्यक्त केलं. निवडणूक आयोगाने आपल्या अधिकारांचा गैरवापर केला, आमची बाजू ऐकून न घेताच घाईत निर्णय घेऊन टाकला, असा युक्तिवाद ठाकरे गटाने केला होता. हाच युक्तिवाद कौल यांनी खोडून काढला. निवडणूक आयोगाने घेतलेली भूमिका योग्य आहे. ठाकरे गट वेळोवेळी निवडणूक आयोगाकडे गेला. निवडणूक आयोगाने ठाकरेंची बाजू वेळोवेळी ऐकून घेतलेली आहे, असं कौल आपल्या युक्तिवादात म्हणाले.

२०१३ मध्ये पक्षप्रमुख हे पद शिवसेनेच्या रचनेत अस्तित्वात होते. बाळासाहेब ठाकरे यांच्या सन्मानार्थ हे पद काही काळ फ्रीझ करण्यात आले होते. ज्यांनी पक्ष उभा केला आणि त्यासाठी मोठे कष्ट घेतले, त्यांच्या स्मरणार्थ पदाबाबत ही भूमिका घेतली होती. बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनानंतर प्रमुख पदाची रचना पुन्हा अस्तित्वात आले. बाळासाहेबांच्या निधनानंतर पक्षप्रमुखपद गोठवलं गेलं आयोगाने सांगितलेलं ठाकरेंनी ऐकले नाही राजकीय पक्ष कोणासोबत आहे हे अध्यक्षांनी तपासायला सांगितले होते.लोकांच्या मताशिवाय पक्षात लोकशाही कशी असेल? असा सवाल देखील निरज किशन कौल यांनी युक्तिवादात उपस्थित केला आहे.निवडणूक आयोगानं अधिकाराचा वापर केलाय ठाकरे काँग्रेससोबत गेले म्हणून पक्षात असंतोष होता हीच एकनाथ शिंदेंची भूमिका होती. ठाकरेंचा युक्तिवादच चुकीच्या मुद्द्यांवर आधारे केला गेला. बाळासाहेबांच्या निधनानंतर पक्षात अचानक बदल केले गेले. पक्षाची रचना एका व्यक्तीच्या मर्जीनं झाली होतीय एका सहीनं जर जबाबदारी मिळत असेल तर कार्यकर्त्यांचे महत्व काय? म्हाला कोर्टाला काही कागदपत्रं सादर करायची आहेत. पक्षांतर्गत निवडणुका घ्या असं निवडणूक आयोगानं वेळोवेळी सांगितले होते काही पक्षांनी सांगूनही निवडणुका पुढे ढकलल्या गेल्या. अध्यक्ष, पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीवेळी निवडणुका आवश्यक आहे. निवडणूक आयोगाने सांगितलेल्या गोष्टी ठाकरेंनी केल्या नाहीत, असेही निरज किशन कौल म्हणाले.

# दिशा सालियन प्रकरणाचा तपास सीबीआयकडे!

## पुराव्याविना कोणालाही आरोपी करु नका;उच्च न्यायालयाचा आदेश

मुंबई/प्रतिनिधी-गेल्या सहा वर्षांपासून आरोप-प्रत्यारोपांमुळे चर्चेत असलेल्या दिशा सालियन मृत्यू प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. या प्रकरणाचा तपास केंद्रीय अन्वेषण विभागाकडे (सीबीआय) सोपविण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सारंग कोतवाल आणि न्यायमूर्ती रणजितसिंह भोसले यांच्या खंडपीठाने बुधवारी दिला आहे. दिशा सालियनचे वडील सतीश सालियन यांनी दाखल केलेल्या याचिकेवर आज सुनावणी पार पडली.

मालवणी पोलिसांनी आतापर्यंत केलेल्या तपासाची सर्व कागदपत्रे सीबीआयकडे सुपूर्द करण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. दिशाचा मृत्यू ज्या परिस्थितीत झाला, त्या संदर्भातील सर्व बाबींचा सखोल तपास करण्याचे निर्देशही सीबीआयला देण्यात आले आहेत. मात्र, पुरेसे पुरावे किंवा वाजवी संशय निर्माण झाल्याशिवाय कोणत्याही व्यक्तीला आरोपी म्हणून वागवू नये, अशी स्पष्ट सूचना न्यायालयाने केली.या प्रकरणाच्या तपासासाठी सीबीआयने अनुभवी अधिकाऱ्याची नियुक्ती करावी, तसेच याचिकाकर्ते सतीश सालियन यांचा जबाब नोंदवून त्याआधारे प्रथम माहिती अहवाल दाखल करावा, असेही न्यायालयाने म्हटले आहे. तपासात गुन्हा घडल्याचे स्पष्ट झाल्यास त्याबाबतचा अहवाल न्यायालयात सादर करावा. गुन्हा घडला नसल्याचे निष्पन्न झाल्यास तसाही अहवाल सादर करावा. या अहवालाला आव्हान देण्याची संधी याचिकाकर्त्यांना राहील, असे खंडपीठाने स्पष्ट केले.

# किनवट बाजार समितीत 'तो मी नव्हेच'चा खेळ!

## आर्थिक घोटाळ्यावर संचालकांचे हात वर;मग तो घोटाळा कुणाचा?

किनवट/प्रतिनिधी-कृषी उत्पन्न बाजार समितीच्या अभिलेखांतील आर्थिक घोटाळ्याच्या प्राप्त नोंदीवरून चौकशी पथक सदस्य सचिव डी.जी.गायकवाड यांनी संचालकांसह सर्वांनाच बजावलेल्या नोटीसांनंतर खुलास्यादाखल बहूतांश संचालकांनी चक्क हात वर केले असून 'तो मी नव्हेच'चा पावित्रा घेतलाय. मग तो आहे तरी कोण याच्या मुळापर्यंत शोधकार्य करण्यात येणार की, अधांतरीच रेंगाळत ठेवणार असा सर्वसामान्यांचा सवाल आहे. सभापती आणि सचिव विरुद्ध काही संचालकवृंदांनी एक दुसऱ्यांविरुद्ध आरोप-प्रत्यारोप करण्यात कसलीही कसर सोडलेली दिसत नाही. उलटपक्षी पुराव्याशिवाय केलेल्या आरोपांविषयी प्रशासनानेच पुरावे द्यावेत अशा आशयाचा पत्ता फेकल्याने कमालीचे वातावरण ढवळून निघाल्याचे दिसते.


किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सचिव रवींद्र राठोड यांच्याकडे अनेक संचालकांची आर्थिक उलाढालीची खतरनाक 'कुंडली' मोबाईलमध्ये कैद असून शेवटचे अस्त्र म्हणून त्याचा वापर केला जाऊ शकतो असा अनेक मान्यवरांनी कयास लावलाय. २५ ऑगस्ट रोजी चौकशी समिती सदस्य सचिव तथा किनवट स्थित सहकारी संस्था कार्यालयाचे सहा. निबंधक गायकवाड यांनी आदेशावरून बजावलेल्या नोटीसांनंतर प्राप्त नोटीस धारकांना स्वयंघोषणापत्र वजा खुलास्यापत्रात बाजू मांडण्याची संधी दिलीय. मात्र 'तो मी नव्हेच'चा त्यांनी राग आळवल्यामुळे प्रकरण निर्णायक भूमिकेपर्यंत पोहोचण्यापूर्वी संभ्रमावस्था निर्माण करण्यात तुर्तास तरी यशस्वी ठरले असेच म्हणायला वाव मिळतेय. महाराष्ट्र शासन,सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या अंतर्गत सहा. निबंधक, सहकारी संस्था, किनवट यांच्या कार्यालयामार्फत किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीतील अभिलेखांची (दस्तऐवजांची) तपासणी करण्यात आली. महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम ४० (अ) व (ब) तसेच नियम ११७ अन्वये पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या आदेशावरून चौकशी सुरु असून चौकशी समिती सदस्य सचिव गायकवाड यांनी आर्थिक व्यवहार प्रकरणी खुलासासंबंधी नोटीसा बजावल्या होत्या. 'तो मी नव्हेच'च्या पावित्र्यामुळे पुन्हा एकदा पणन प्रशासनासमोर पेचप्रसंग निर्माण होऊन डोके दुखी वाढण्याची सरळ शक्यता दिसते. पुढे काय काय घडामोडी घडतील हे पहाणे सुद्धा औचुक्याचे ठरणार आहे.

# वेलनेस स्पा सेंटरवर पोलीसांची कारवाई;सात महिलांची सुटका

## स्पा सेंटरच्या नावाखाली चालू होता कुंटनखाना

नांदेड/प्रतिनिधी-शहरातील मध्यभागी असलेल्या फुले मार्केट मधील वेलनेस स्पा सेंटरवर मंगळवारी रात्री स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पथकाने धाड टाकुन देह व्यापार करणाऱ्या सात महिलांची सुटका केली. या प्रकरणी पोलीसांनी तीन जणांना अटक केली असून स्पा सेंटरचा मालक फरार झाला आहे.

शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या काही हाकेवर असलेल्या महात्मा फुले मार्केटमधील वेलनेस स्पा सेंटरमध्ये कुंटनखाना सुरु असल्याची गुप्त माहिती पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांना मिळाली. पोलीस अधीक्षकांनी स्पा सेंटरवर कारवाई करण्याचे आदेश स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाला दिले. पोलीस निरीक्षक अतुल भोसले व शिवाजीनगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांच्या नेतृत्वाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण विभाग व अनैतिक



मानवी व्यापार प्रतिबंधक कक्ष मधील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे पथक तयार करण्यात आले. मंगळवार दि.१ सप्टेंबर रोजी रात्री पोलीसाच्या पथकाने एक बनावट ग्राहक तयार करुन फुले मार्केट येथील वेलनेस स्पा सेंटर येथे

पान ४ वर

# हडको येथील जुगार अड्ड्यावर पोलीसांचा छापा; १३ जणांना अटक

नांदेड/प्रतिनिधी-हडको भागातील दादाराव जाधव यांच्या फार्महाऊस जवळ सुरु असलेल्या जुगार अड्ड्यावर नांदेड ग्रामीण पोलीसांनी बुधवार दि.२ सप्टेंबर रोजी धाड टाकुन १३ जणांना अटक केली. त्यांच्या जवळून ३ लाख ५५ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला.

हडको भागातील एका फार्महाऊस जवळ जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती नांदेड ग्रामीण पोलीसांना मिळाली. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या नेतृत्वाखाली आज (बुधवार) रोजी पोलीसांच्या एका पथकाने जुगार अड्ड्यावर छापा टाकला. पैसे लावून तिर्रट नावाचा जुगार खेळत असतांना काळबा आनंदराव गिरडे रा.असदवन, राम पांडूरंग मुळे रा.हरडफ ता.हदगाव, अरुण गौतम लोहकरे रा.हडको, हरिदास माधवराव पुयड रा.वाघाळा, दीपक आबाजी खैरे रा.झरी, श्याम मारोती गिरे रा.झरी, शेख साजीद शेख रशीद रा.पांगरी, किशन व्यंकटराव घोगरे रा.असदवन, श्रीकांत साहेबराव इंगेवाड रा.वाघाळा, दत्ता किशन पवार रा.असदवन, काळेश्वर पंडीतराव मोरे रा.सिडको, दादाराव जाधव व सर्जेराव खैरे यांना अटक केली. इतर दोन जण पळून गेले. आरोपींकडून पोलीसांनी रोख रक्कम, बारा मोबाईल, पाच दुचाकी असा ३ लाख ५५ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. आरोपी विरुध्द नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात मुंबई जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पो.नि.गणेश कराड यांची नियंत्रण कक्षात बदली;पीडित महिलेचे आंदोलन तुर्त स्थगित

## सखोल तपास करुन कारवाईचे दिले लेखी आश्वासन

किनवट/प्रतिनिधी-गोकुंदा येथील शासकीय विश्रामगृहात विधवा आदिवासी महिलेच्या विनयभंग प्रकरणी गुन्हा दाखल करण्यास दिरंगाई व आरोपींना पाठीशी घालण्याचा प्रयत्न करणारे किनवट पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांची पोलीस नियंत्रण कक्षात बदली करण्यात आली आहे. कराड यांची विभागीय चौकशी करण्याचे लेखी आश्वासन वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी दिल्यामुळे पीडित महिलेने व आदिवासी समाज बांधवांनी आंदोलन तुर्त स्थगित केले आहे.

गोकुंदा येथील शासकीय विश्रामगृहाच्या स्वयंपाकगृहात आदिवासी विधवा महिला काम करीत असत. विश्रामगृहात कार्यरत असलेल्या एका कर्मचाऱ्याने सदरील महिलेचा विनयभंग करुन अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार सदरील महिलेसोबत दोनवेळा झाल्यानंतर तीने किनवट पोलीस स्टेशन गाठून लेखी स्वरुपात कैफीयत मांडली. परंतु सदर महिलेला पोलीस ठाण्यात अनेक तास बसवून ठेवण्यात आले. पोलीसांनी संबंधीत महिलेची दोन दिवस तक्रार दाखल करुन घेतली नाही. त्यानंतर लोकप्रतिनिधी व आदिवासी समाज संघटनेने आक्रमक भूमीका घेतल्यानंतर आरोपी विरुध्द विनयभंग व अ‍ॅट्रासिटी अ‍ॅक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हेगारांना पाठीशी घालणारे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या विरुध्द कारवाई करुन त्यांना सहआरोपी करण्याची मागणी पीडित महिलेने केली होती. त्यामुळे पोलीस निरीक्षक कराड यांच्या विरुध्द केलेली तक्रार मागे घेण्यासाठी महिलेवर काही जणांनी दबाव टाकण्याचा प्रयत्न केला. सदर पीडित महिलेने १ सप्टेंबर पासून आमरण उपोषण सुरु केले होते. तसेच बुधवार दि.२ सप्टेंबर रोजी आत्मदहनाचा इशारा दिला होता. त्यामुळे बुधवारी किनवट शहरात प्रचंड पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. पोलीस उपअधीक्षक चंद्रशेखर कदम यांनी पीडित महिलेशी व आदिवासी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत चर्चा केली.

घडलेल्या घटनेनंतर व्यथित झालेल्या महिलेच्या जखमेवर मीठ चोळणाऱ्यांचे मोबाईल सीडीआर आणि सीसीटीव्ही फुटेज हस्तगत करण्यासाठी युद्ध पातळीवर हालचालींना वेग आल्याचे सूत्रांनी सांगितले. २७ ऑगस्ट रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने किनवट पोलीस ठाण्याचे प्रभारी यांची प्रमुख मागणी लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक डॉ.नीलाभ रोहन यांनी पोलीस नियंत्रण कक्षात गणेश कराड यांची तडकाफडकी रवानगी केली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम यांनी दिलेल्या अधिकृत आश्वासन पत्रावरून पिडीतेने तुर्तास आंदोलन मागे घेतल्याचे सांगण्यात आले.

पिडीतेच्या मागणीनुसार प्रभारी अधिकाऱ्यांची तात्काळ पोलीस नियंत्रण कक्ष येथे रवानगी करण्यात आली आहे. उर्वरित मागण्यांसंदर्भात सखोल तपास करून कायदेशीर कार्यवाही केली जाईल, असे प्रशासनाकडून आश्वस्त करण्यात आले आहे. मुख्य मागणी मान्य झाली असल्याने उपोषण मागे घ्यावे, असे उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदमांनी आश्वाशित केल्याने उपोषणार्थींनी उपोषणाला स्थगिती दिलीय.पिडीत महिलेच्या पत्रातील ज्यांनी ज्यांनी दबावतंत्राचा वापर केलाय, अशांची पुरावे पडताळणीची शक्यता गृहीत धरून सीसीटीव्ही फुटेज आणि सीडीआरची खातरजमा करण्यासाठी योग्य पाऊल उचलले जाणार आहेत. किमान आठवडा-भराचा कालखंड लागू शकतो.परंतु २ सप्टेंबर रोजीचे वातावरण

पान ४ वर

# भारत फायनन्शियल कंपनीची फसवणूक

नांदेड/प्रतिनिधी-भारत फायनन्शियल कंपनीची २२ लाख रुपयांची फसवणूक केल्या प्रकरणी १३ जणां विरुध्द माहूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कंपनीत कार्यरत असलेल्या १३ कर्मचाऱ्यांनी १ मार्च २०२२ ते १७ ऑक्टोबर २०२५ या काळात कर्जदारांकडून २२ लाख ३५ हजार रुपये वसूल केले होते. वसूल केलेली रक्कम कंपनीच्या खात्यात जमा न करता स्वतःच्या फायद्यासाठी वापरली. कंपनीचे मॅनेजर विनायक महामुने यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माहूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'सर्वोच्च'स्वागतार्ह निर्णय

**लोकशाहीमध्ये आंदोलनाचा अधिकार हा केवळ संविधानाने दिलेला अधिकार नाही, तर तो जनतेच्या असंतोषाला व्यक्त होण्याचा महत्त्वाचा मार्ग आहे. विशेषतः विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर सरकारने संवेदनशीलतेने आणि संयमाने भूमिका घेणे अपेक्षित असते. मात्र, नीट परीक्षा घोटाळ्याच्या प्रश्नावर विद्यार्थ्यांनी दिल्लीतील जंतर-मंतरवर केलेल्या आंदोलनाच्या काळात सरकार आणि पोलिसांची भूमिका अनेक प्रश्न उपस्थित करणारी ठरली. या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने घेतलेला निर्णय हा केवळ आंदोलनकर्त्यांसाठी दिलासा देणारा नाही, तर लोकशाही मूल्ये आणि न्यायव्यवस्थेवरील विश्वास दृढ करणारा निर्णय म्हणून त्याचे स्वागत करावे लागेल. नीट परीक्षेतील कथित गैरप्रकारां-विरोधात सुरू झालेल्या आंदोलनाला सुरुवातीला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. आंदोलनाकडे दुर्लक्ष करून सत्ताधारी सुखावले होते. परंतु आंदोलनकर्त्यांच्या मागण्यांकडे गांभीर्याने पाहण्याऐवजी त्यांच्यावर कठोर कारवाईचा मार्ग स्वीकारला गेला आणि परिस्थिती अधिक चिघळत गेली. जगप्रसिद्ध संशोधक सोनम वांगचुक यांना उपोषणस्थळावरून जबरदस्तीने हटविण्याची कारवाई आणि त्यानंतर त्यांच्यावर ठेवण्यात आलेले निर्बंध यामुळे आंदोलनकर्त्यांच्या भावना अधिक तीव्र झाल्या. यानंतर विद्यार्थ्यांचा संसदेवर मोर्चा काढण्यात आला. देशभरातून मोठ्या संख्येने विद्यार्थी दिल्लीमध्ये दाखल झाले. आंदोलनाच्या दिवशी केंद्रीय मंत्री जे.पी. नड्डा यांनी आंदोलनकर्त्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. मात्र, दीर्घकाळ चाललेल्या चर्चेत अपेक्षित तोडगा निघाला नाही. त्यामुळे संताप आणखी वाढला. अशा वातावरणात आंदोलनात काही अराजकीय घटक घुसल्याचेही आरोप झाले. नागरी वेशातील काही व्यक्तींच्या हातात खिळे लावलेल्या काठ्या असल्याचे सांगण्यात आले आणि त्यांच्याकडून विद्यार्थ्यांवर हल्ले करण्यात आल्याचेही समोर आले. पोलिसांवरही अशा प्रकारे हल्ले झाले. मात्र, या घटनांमागील सूत्रधारांचा शोध घेण्याऐवजी मोठ्या प्रमाणावर आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांवरच गुन्हे दाखल झाले, ही बाब निश्चितच गंभीर होती. आंदोलनस्थळ उध्वस्त करण्यात आले, अनेक विद्यार्थ्यांचा शोध घेण्यात आला आणि देशभरातील विविध भागांत आंदोलनात सहभागी झालेल्या तरुणांवर गुन्हे दाखल करण्यात आले. आंदोलनात सहभागी होणे हा गुन्हा नसताना विद्यार्थ्यांना गुन्हेगाराच्या नजरेने पाहण्याची प्रवृत्ती लोकशाहीसाठी घातक आहे. एकीकडे दिल्ली आणि देशभरातील अत्याधुनिक फेस डिटेक्टर तंत्रज्ञानाचा वापर करून आंदोलनकर्त्यांच्या घराघरात पोहोचण्याची तत्परता दाखविली जात होती; दुसरीकडे अधिकार नसताना विद्यार्थ्यांवर खिळे लावलेल्या काठ्यांनी अमानुष हल्ला करणाऱ्या संवेदनशील गुंडांवर मात्र कारवाई झाल्याचे दिसले नाही. पोलिसांनी त्यांचा साधा शोध घेण्याचाही प्रयत्न केला नाही, ही बाब अधिकच संतापजनक आहे. काही व्यक्तींनी हिंसाचार केला असेल तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई झालीच पाहिजे; परंतु त्यासाठी संपूर्ण आंदोलनालाच गुन्हेगारी ठरविणे हा न्यायाचा मार्ग होऊ शकत नाही. 'चोर सोडून संन्याशाला फाशी' अशी परिस्थिती निर्माण झाली तर सामान्य नागरिकांचा व्यवस्थेवरील विश्वासच डळमळीत होतो. आंदोलनकर्त्यांशी झालेल्या चर्चेनंतर त्यांच्या मागण्या मान्य करण्यात आल्या. मात्र, त्यानंतरही आंदोलनात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांवरील गुन्हे आणि पोलिसांकडून सुरू असलेला शोध यामुळे प्रश्न कायम राहिला. पेपरफुटी आणि परीक्षेतील गैरप्रकारांमुळे विद्यार्थ्यांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले, काही विद्यार्थ्यांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलले आणि त्यांच्या कुटुंबीयांवर असह्य दुःख कोसळले. अशा वेळी दोषींवर कठोर कारवाई करण्याऐवजी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांनाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणे ही व्यवस्थेची संवेदनशीलता हरविल्याची निशाणी ठरते.या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने भारतीय राज्यघटनेने दिलेल्या विशेष अधिकारांचा वापर करून आंदोलनकर्त्यांवरील देशभरातील गुन्हे मागे घेण्याचे आदेश दिल्याचे वृत्त निश्चितच स्वागतार्ह आहे. पेपरफुटीनंतर आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्यासाठी केंद्र सरकारला कालबद्ध कार्यक्रम आखण्याचे निर्देश आणि आंदोलनादरम्यान पोलिसांच्या कारवाईत जखमी झालेल्या विद्यार्थ्यांना मदत करण्याचे आदेशही महत्त्वाचे आहेत. त्याचबरोबर अधिकार नसताना अमानुषपणे लाठीहल्ला करणाऱ्या आणि विद्यार्थ्यांवर खिळे लावलेल्या काठ्यांनी हल्ला करणाऱ्या व्यक्तींचा शोध घेण्याचे आदेशही सर्वोच्च न्यायालयाने द्यायला हवेत. केंद्र सरकारने अशा व्यक्तींचा शोध घेऊन त्यांना कठोर शिक्षा केली पाहिजे, हीच आमची मागणी आहे.सर्वोच्च न्यायालयाचा हा हस्तक्षेप केवळ एका आंदोलनापुरता मर्यादित नाही. तो राज्यसत्तेला एक महत्त्वाचा संदेश देतो.लोकशाहीमध्ये सरकारला प्रश्न विचारणारा नागरिक शत्रू नसतो. आंदोलन करणारा विद्यार्थी गुन्हेगार नसतो. हिंसाचार करणाऱ्यांवर कारवाई झाली पाहिजे; परंतु शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्यांना शिक्षा देणे योग्य नाही.न्यायालयाचा हा निर्णय विद्यार्थ्यांच्या जखमेवर फुंकर घालणारा आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे, अन्यायाविरुद्ध आवाज उठविणाऱ्या प्रत्येक नागरिकाला संविधानाच्या संरक्षणाची जाणीव करून देणारा आहे. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाचे मनःपूर्वक स्वागतच करावे लागेल. न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ करण्यासाठी आणि लोकशाहीतील नागरिकांच्या अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी हा निर्णय निश्चितच मैलाचा दगड ठरू शकतो.**

# आपण सुधारण्याची गरज

सध्या नेपाळला महापूर आलाय व त्या महापुरामुळं कितीतरी प्रकारची हानी झालीय व त्या हानीतून नुकसान. हे का घडलं? तर त्याचं उत्तर आहे ग्लेशिअर पिघलण्यानं हे घडलं. ग्लेशिअर का पिघललं? तर त्याचं उत्तर आहे, वातावरण गरम झाल्यानं ग्लेशिअर पिघललं आणि वातावरण का गरम झालं? तर त्याचं उत्तर आहे, कारखान्यातून निघणाऱ्या विषारी वायूनं वातावरण गरम झालं. जो वायू हवेतील ऑक्सीजनशी संयोग पावला. ज्यानं शुद्ध ऑक्सीजनची मात्रा कमी केली? जो एका काळात सुर्याच्या अतिनील किरणांना थांबवत होता. महापूर.. महापूराबाबत सांगायचं झाल्यास पावसाळा लागला की महापूर येणारच आणि त्यातून दुष्काळ निर्माण होणारच.महापूर कोणत्या भागात येतो? या प्रश्नाचं उत्तर आहे, सखल भागात. डोंगराळ भागात तेवढा महापूर येत नाही आणि सखल भागात महापूर आलाच तर त्याच्या आजुबाजूची घरं, झाडे, पशूपक्षी, स्थावर मालमत्ता आणि इतर प्रकारची मालमत्ता, जीवीत व वित्तहानी होतच असते.



महापूर जसा सखल भागात येतो. तसाच महापूर डोंगराळ भागातही येतो. सखल भागात येत असलेला महापूर हा त्या भागाला जर डोंगर वा झाडं लागून असतील वा समुद्र लागून असेल तर येत असतो. त्याला कारणही तसंच आहे. समुद्रालगत लाटांच्या तीव्र घर्षणानं जे वातावरण तयार होतं. त्या वातावरणावर सुर्याच्या उष्णतेचा परिणाम होतो व सुर्याच्या उष्णतेनं जसं समुद्रातील पाणी तापतं. तशीच समुद्राच्या पाण्यालगत असलेली हवाही कमीअधिक प्रमाणात तापते. ज्याचा संयोग हा हवेतील वातावरणाशी होतो व वारे तयार होतात. कधीकधी त्यातूनच वादळं तयार होतात. हे वारे वा ही वादळं जमीनीलगत दूरच्या प्रदेशापर्यंत वाहात जातात. त्या वाऱ्यात बाष्पाचे कण विपूल प्रमाणात असतात. हेच बाष्पाचे कण ज्या ठिकाणी विपूल प्रमाणात झाडं असतात वा डोंगरं असतात. त्या ठिकाणी अडतात व तिथंच ढगफुटी होते व तिथं ढगफुटी झालीच तर मग पूर अर्थात कधीकधी महापूरही. मात्र डोंगराळ भागातील ढगफुटीचं कारण वेगळंच असतं तिथं ढग हे नसतातच. मग का बरं तिथं महापूर येतो? त्याचं कारण आहे, ग्लेशिअरचं खचणं वा पिघलणं. ग्लेशिअर अर्थात बर्फ. डोंगराळ भागात हवामान थंड असते. ते एवढं थंड असते की त्या ठिकाणी वर्षभर पाण्याची बर्फच अवस्था असते. परंतु सध्याच्या काळात त्याही ग्लेशिअरवर वातावरणाचा परिणाम होत असल्यानं त्या ग्लेशिअरचे जे उंच उंच पर्वत बनले आहेत. ते पिघलतात. मग काय, ते पिघलले की बस, कितीतरी प्रमाणात पाणी नदीतून ओसांडून वाहात असतं. मग त्या पाणी जिकडे जागा मिळेल, तिकडे वाहात जात असते. ते पाणी कुठं घरं आहेत की नाही आहेत. हे काहीही पाहात नाही. मग महापूर येतो. हा महापूर एवढ्या तीव्र स्वरुपाचा असतो की तो कितीतरी प्रमाणात मनुष्यहानी तसेच वित्तहानीही करतो.

सध्या नेपाळची अवस्था अशीच झालेली आहे. मागे २०१३ ला केदारनाथ व बद्रीनाथला महापूर आला. ज्यातून कितीतरी प्रमाणात त्या ठिकाणचं नुकसान झालं. ज्याला ग्लेशिअरचं पिघलणं. हे कारण दिलं गेलं आणि आता तब्बल तेराच वर्षानं म्हणजे २०२६ ला जो महापूर आलेला दिसत आहे. तोही अशाच स्वरुपानं आलेला दिसत आहे. यातही ग्लेशिअरचं पिघलणं. हेच एकमेव कारण आहे.ग्लेशिअर का पिघलतो? त्याला कारण आहे, आज वाढलेलं तापमान. तापमान का वाढत आहे? त्याला कारण आहे वातावरण. अन् वातावरण का तापत आहे? त्याला कारण आहे, लोकांचं राहणीमान. लोकँ प्लॅस्टिकजन्य वस्तूंचा एवढा वापर करतात की त्यानं जमीनीचं पर्युषण होतं. शिवाय कारखान्यातून निघणारा सल्फर डाय ऑक्साईड आणि हायड्रोजन सल्फाईड हे दोन्ही विषारी घटक. त्यांच्या संयुगाचा वातावरणातील ऑक्सीजन, हायड्रोजन, नायट्रोजन या सर्वांशी संयोग होतो. परिणामी ऑक्सीजन कमी होतो. शुद्ध ऑक्सीजनचं रुपांतरण ऑक्साईड मध्ये होतं. याचाच अर्थ ऑक्सीजन हा सुट्या स्वरुपात राहात नाही. तो कोणत्यातरी संयुगात मिसळतो. त्यानंतर जो शुद्ध स्वरुपातील ऑक्सीजन सुर्याच्या अतिनील किरणाला अडवतो. त्याची मात्रा कमी होते व सुर्याच्या उष्णतेची अतिनील किरणं, थेट पृथ्वीवर येवून धडकतात. ज्यातून जमीन तापते. तसंच पाणीही तापते. ज्यातून वारंच नाही तर वादळ निर्माण होतात. अशी बाष्पाची वादळं की जी ढगफुटी करतात. अन् असं तापमान वाढतं की ज्यातून ग्लेशिअर वितळून त्यात असलेल्या पाण्याच्या मात्रेनंही महापूर येत असतो.

महापूर हे भविष्यात भरपूर वेळेस येणारच आहेत. कारण आहे, आपलं नियंत्रण. आपण आजही सुधारलेलो नाहीत. आपण आजही अंधश्रद्धाळूच आहोत. आपल्याला पाऊस, महापूर, पूर कसा येतो. याचं गणित कळत नाही. पाऊस येणे वा महापूर येणे. या घटनांना आपण अंधश्रद्धाच मानतो. म्हणतो की देवच पाऊस पाडतो व देवच पूरही आणतो. त्यातच मरणाबाबतही आपल्या मनात महाभयंकर स्वरुपाची अंधश्रद्धा आहे. आपण विचार करतोय की आपल्याला काय करायचंय. मरणारे मेलेत. कारण त्यांच्या नशीबातच तिथंच मरणं लिहून होतं. आपली मरणाबाबत अशी अंधश्रद्धा आहे. त्यामुळं आपण स्वतः काय करतो आहोत. हे विचारात घेत नाही आणि स्वतःला सुधारणेच्या कक्षेत टाकत नाही की ज्यातून महापूर येणार नाही. ज्यातून पूर आपल्याला छळणार नाही. पुर येण्याला जबाबदार आहोत आपणच. आपणच कारखाने काढले ना. ज्याचा परिणाम म्हणजे सल्फर डाय ऑक्साईड व हायड्रोजन सल्फाईड त्यातून निघणे व त्यातील घटकांचे शुद्ध ऑक्सीजनशी संयोग पावणे. ज्यातून ऑक्सीजन कमी होणे व त्याची अकार्यक्षमता ही सुर्याला कळणे. हे आपलं नित्याचं काम. दुसरं आपलं काम आहे. अनावश्यक प्लॅस्टिकची उपलब्धता करणे. ज्याचा परिणाम झाडं न वाढणे. जमीन खराब होणे. वातावरण तापणे. ज्यातून ग्लेशिअर पिघलणे. यासारख्या आपल्या कृती. मग कसा पिघलणार नाही ग्लेशिअर? तो पिघलेलच व महापूर येणारच.

**अंकुश शिंगाडे**
नागपूर

विशेष सांगायचं म्हणजे आपली आज स्वतः सुधारण्याची गरज आहे. आपण जर स्वतः सुधारलो तर वातावरण सुधारेल. वातावरण सुधारले की पाऊस सुधारेल आणि पाऊस सुधारला की पूर व महापूर सुधारेल. अन् महापूर सुधारला की मग सबंधीत सर्व मानवी जीवन. त्यासाठी आपला त्याग महत्वपुर्ण. यात शंका नाही. परंतु जर आपण सुधारलो तर...अन् आपण सुधारतोच नाही तर वरील घटकांपैकी कोणीच सुधारणार नाही व प्रत्येकजण आपलंच कार्य करेल व एकवेळ अशी येईल की ही सुष्टी नष्ट होईल. म्हणूनच आपलीच सुधारण्याची गरज आहे. तेव्हाच सुष्टी सुधारेल. नाहीतर सुष्टीही आपला विनाश केल्याशिवाय राहणार नाही. ही बाब तेवढीच लक्षात घेण्यासारखी आहे.

# पाच अधिपरिचारिकांच्या बदल्यांना तीन महिने;त्यांच्या जागी एकही नियुक्ती नाही

## आदिवासी रुग्णांच्या जीवाशी खेळ?




माहूर/प्रतिनिधी-आदिवासीबहुल आणि दुर्गम माहूर तालुक्यातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रमुख आधार असलेल्या माहूर ग्रामीण रुग्णालयाची अवस्था दिवसेंदिवस बिकट होत असून, आरोग्यसेवेचा कणा असलेल्या अधिपरि-चारिकांचीच पदे रिक्त ठेवून प्रशासनाने रुग्णांच्या जिवाशी खेळ चालविला आहे काय, असा संतप्त सवाल आता नागरिकांकडून उपस्थित होत आहे. तालुक्यातील ६२ ग्रामपंचायतींपैकी तब्बल ४२ ग्रामपंचायती पेसा क्षेत्रात येतात. त्यामुळे या भागातील आदिवासी तसेच सर्वसामान्य नागरिकांसाठी माहूरचे ग्रामीण रुग्णालय अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र, आवश्यक मनुष्यबळाअभावी हे रुग्णालयच आता व्हेंटिलेटरवर असल्याचे चित्र आहे.

माहूर ग्रामीण रुग्णालयात अधिपरिचारिकांची सात पदे मंजूर असताना त्यापैकी तब्बल पाच अधि-परिचारिकांच्या प्रशासकीय बदल्यांचे आदेश ८ जून रोजी उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळ लातूर यांनी काढले. बदल्यांना जवळपास तीन महिने उलटत आले तरी त्यांच्या जागी अद्याप एकाही अधिपरिचारिकेची नियुक्ती झालेली नाही. आरोग्यसेवेतील एवढी महत्त्वाची पदे रिक्त ठेवून रुग्णालयाचा कारभार कोणत्या आधारावर सुरू आहे, हा प्रश्न आता प्रशासनाच्या दारात उभा ठाकला आहे. डॉक्टरांनंतर रुग्णांची प्रत्यक्ष सेवा, औषधोपचार, देखभाल आणि रुग्णांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवण्याची महत्त्वाची जबाबदारी अधिपरिचारिकांची असते. मात्र, मंजूर सातपैकी पाच पदे रिक्त असतील तर रुग्णसेवेवर त्याचा परिणाम होणार नाही तर काय होणार? दुर्गम भागातील गरीब, आदिवासी आणि सर्वसामान्य नागरिकांनी उपचारासाठी कुठे धाव घ्यायची, असा सवाल संतप्त नातेवाईक करीत आहेत. माहूर हे तालुक्याचे ठिकाण असले तरी येथे अद्ययावत आणि सक्षम शासकीय रुग्णालयाची सुविधा उपलब्ध नसल्याने ग्रामीण भागातील नागरिक मोठ्या अपेक्षेने ग्रामीण रुग्णालयात येतात. मात्र, मनुष्यबळाच्या कमतरतेमुळे वेळेवर उपचार मिळण्यात अडथळे येत असल्याच्या तक्रारी आहेत. काही रुग्णांना उपचाराऐवजी दुसरीकडे रेफर करण्याची वेळ येत असल्याचेही आरोप होत आहेत. म्हणजे रुग्णालय उभारले, पदे मंजूर केली, मात्र पदांवर कर्मचारीच नाहीत; मग ही आरोग्यसेवा नेमकी कोणासाठी? एकीकडे शासन दुर्गम आणि आदिवासी भागातील नागरिकांना आरोग्य सुविधा देण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च करीत असल्याचे सांगते आणि दुसरीकडे प्रत्यक्ष रुग्णालयात आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात प्रशासन अपयशी ठरत असेल तर या विरोधाभासाला जबाबदार कोण? रुग्णालयाच्या बाहेरची इमारत कितीही चकाचक असली तरी आत रुग्णाला वेळेवर उपचार मिळत नसतील तर ती आरोग्यसेवा कसली? माहूर ग्रामीण रुग्णालयाची अवस्था त्यामुळे वरून झकपक, आतून भकभक अशी झाल्याची टीका होत आहे. पाच अधिपरिचारिकांच्या बदल्या करून त्यांच्या जागी तीन महिने नवीन नियुक्त्या न करणे हा केवळ प्रशासकीय विलंब आहे की ग्रामीण रुग्णालयाची सेवा कमकुवत करण्यामागे काही वेगळे कारण आहे, असा सवाल रुग्ण कल्याण समितीचे सदस्य अनिल वाघमारे यांनी उपस्थित केला आहे. माहूर ग्रामीण रुग्णालयातील पाच अधिपरिचारिकांच्या बदल्या केल्यानंतर त्यांच्या जागी तब्बल तीन महिने नवीन नियुक्त्या न करणे, हा केवळ प्रशासकीय विलंब आहे की ग्रामीण रुग्णालयाची सेवा कमकुवत करण्यामागे काही वेगळे षडयंत्र तर नाही? परिक्रमा यात्रा काळात अतिरिक्त नियुक्त डॉक्टरांनी केवळ औपचारिकता केली का? मागील परिक्रमा यात्रा काळातही असाच प्रकार झाला होता, असा सवाल वाघमारे यांनी केला आहे. दरम्यान, अनुसूचित जमाती समितीच्या माहूर दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पेरके माहूर येथे आले असता रुग्ण कल्याण समितीचे माजी सदस्य सरफराज दोसानी यांनी ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे, डॉक्टरांची कथित अनियमित सेवा, रुग्णांना उपचाराऐवजी रेफर करण्याचा प्रकार, तुटलेल्या खिडक्या-दरवाजे आणि अस्वच्छतेचा मुद्दा उपस्थित केला. यावेळी तुम्ही असेच तक्रार करत राहाल तर माहूरचे ग्रामीण रुग्णालय बंद पडेल. माहूरला ड्युटी करायला कोणीच यायला तयार नसते, अशा आशयाचे उत्तर जिल्हा शल्यचिकित्सकांनी दिले होते. जर एखाद्या शासकीय रुग्णालयातील त्रुटी दाखवून देणाऱ्या नागरिकाला सुधारणा करण्याऐवजी रुग्णालय बंद पडेल असे सांगितले जात असेल, तर मग प्रशासनाला नेमके काय अपेक्षित आहे? रुग्णांनी गप्प बसावे, तक्रारी करू नयेत आणि आरोग्यसेवेची पडझड पाहत बसावे का? माहूरचे ग्रामीण रुग्णालय सुधारायचे आहे की हळूहळू मोडकळीस आणायचे आहे? हा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

# डॉ.गोविंद नांदेडे यांचा खेडकरवाडीत ग्रामस्थांकडून भव्य नागरी सत्कार

नांदेड/प्रतिनिधी-प्राथमिक शिक्षक म्हणून आपल्या कार्याची सुरुवात करून राज्याच्या शिक्षण संचालकपदापर्यंत उल्लेखनीय वाटचाल करणारे डॉ. गोविंद नांदेडे यांनी शैक्षणिक क्षेत्रात ३८ पदव्या आणि सात सुवर्णपदके मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्यांच्या या शैक्षणिक कामगिरीची नोंद इंग्लंडच्या लंडन बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये करण्यात आली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल खेडकरवाडी ग्रामस्थांच्या वतीने डॉ. नांदेडे यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला.

या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी शिवा संघटनेचे संस्थापक तथा सेवा जनशक्ती पार्टीचे अध्यक्ष प्रा. मनोहर धोंडे होते. प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त सनदी अधिकारी एकनाथ ऊर्फ अनिल मोरे, उपशिक्षणाधिकारी गंगाधर राठोड आणि सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी सर्जेराव टेकाळे उपस्थित होते. याप्रसंगी गावातील माजी सरपंच बाबूसराव नेळगे, माजी चेअरमन रामराव खेडकर, मारोतराव नागसाखरे, माजी सैनिक माधव झरे, कैलास नागसाखरे, गणेश खेडकर, बालाजी नागसाखरे, नामदेव कारेगावकर, माधव दगडगावे, पोलीस पाटील शिवानंद खेडकर, विश्वनाथ नेळगे, बसवेश्वर नेळगे, लक्ष्मण नागसाखरे, संभाजी खेडकर, धोंडीराम खेडकर, आपाराव नेळगे, गुंडेराव खेडकर, लक्ष्मण मारवाडे, गुणाजी खिचडे, राजु बारोळे, माधव स्वामी, सोमनाथ नेळगे, संदिप नागसाखरे, गंगाधर नेळगे, अशोक खेडकर, बापुराव नागसाखरे, रावसाहेब नेळगे, शिवा खेडकर, उपस्थित होते. डॉ. गोविंद नांदेडे यांनी प्राथमिक शिक्षक म्हणून आपल्या सेवाकार्याला सुरुवात केली. शिक्षण क्षेत्रातील विविध जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत त्यांनी राज्याच्या शिक्षण संचालकपदापर्यंत मजल मारली. सेवाकाळा सोबतच शिक्षणाची अखंड साधना सुरू ठेवत त्यांनी विविध १२ विद्यापीठं ३०४ परीक्षा ३८ पदव्या सात सुवर्णपदक मिळवले आहेत. त्यांच्या या असामान्य शैक्षणिक वाटचालीचे कौतुक करत ग्रामस्थांनी त्यांचा सन्मान केला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी डॉ. नांदेडे यांच्या कार्याचा गौरव करून त्यांच्या शैक्षणिक जिद्दीतून तरुणांनी प्रेरणा घ्यावी, असे आवाहन केले. कार्यक्रमास खेडकरवाडीतील ग्रामस्थ, नागरिक, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर आणि विविध क्षेत्रांतील पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सेवानिवृत्त सनदी अधिकारी एकनाथ मोरे, उपशिक्षणाधिकारी गंगाधर राठोड, सर्जेराव टेकाळे, यांची भाषणे झाली, प्रास्ताविक बालाजी नागसाखरे यांनी तर आभारप्रदर्शन आनंद वाळके यांनी केले.

सायंदैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# पावसाने दिली हुलकावणी;बळीराजाच्या नजरा आभाळाकडे!

## पिके वाढीच्या टप्प्यात,मात्र पावसाची ओढ कायम

माहूर/प्रतिनिधी-सुरुवातीला झालेल्या पेरणीयोग्य पावसाच्या भरवशावर शेतकऱ्यांनी खरीप हंगामातील पेरण्या उरकल्या. त्यानंतर काही दिवस अधूनमधून पावसाच्या सरी कोसळल्याने पिकांनीही उभारी घेतली. मात्र, सध्या पिकांना पाण्याची नितांत गरज असताना पावसाने अचानक पाठ फिरवल्याने माहूर तालुक्यातील शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. दररोज आकाशात ढगांची गर्दी होते, आशा निर्माण होतात; मात्र काही वेळातच ढग विरळ होऊन आभाळ स्वच्छ होत असल्याचे चित्र आहे.

पावसाची प्रतीक्षा करताना शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे खिळल्या आहेत.पावसाचा खंड वाढत चालल्याने खरीप पिकांच्या वाढीवर त्याचा परिणाम होण्याची भीती व्यक्त होत आहे. माहूर तालुक्यात यंदा पावसाचे प्रमाण अपेक्षेप्रमाणे राहिले नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. गेल्या काही वर्षांत अतिवृष्टी आणि मुसळधार पावसामुळे खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले होते. यंदा मात्र परिस्थितीने वेगळेच वळण घेतले असून, पाऊस कमी पडत असल्याने शेतकऱ्यांसमोर नवे संकट उभे ठाकले आहे. सुरुवातीच्या पावसामुळे जमिनीत ओलावा निर्माण झाला आणि पिकांची उगवण चांगली झाली. सोयाबीनसह इतर खरीप पिके सध्या वाढीच्या अवस्थेत आहेत. मात्र, गेल्या काही दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने जमिनीतील ओलावा झपाट्याने कमी होत आहे. पिकांना वेळेवर पाऊस मिळाला नाही तर उत्पादनावर त्याचा थेट परिणाम होण्याची शक्यता आहे.विशेषतः सोयाबीन पिकासाठी सध्याच्या काळात पावसाची गरज असल्याने शेतकऱ्यांची चिंता अधिक वाढली आहे. पावसाचा खंड आणखी लांबल्यास पिकांची वाढ खुंटण्याबरोबरच अपेक्षित उत्पादनात घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकरी दिवसभर शेताकडे आणि वारंवार आभाळाकडे पाहताना दिसत आहेत.एकीकडे पावसाचे आगमन होत नसल्याने शेतकरी चिंतेत आहेत, तर दुसरीकडे दररोज आकाशात जमा होणारे ढग आशा निर्माण करून पुन्हा निराशा देत आहेत.

# बाफना-जुना मोंढा सिमेंट रस्त्याच्या कामाची माहिती देण्यास सा.बां.विभागाची टाळाटाळ

## जगदीपसिंघ नंबरदार यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरातील बाफना ते जुना मोंढा दरम्यान सुरू असलेल्या सिमेंट रस्त्याच्या कामात अनियमितता झाल्याचा संशय व्यक्त होत असून, या कामासंदर्भात माहिती अधिकारातून माहिती मागणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्याला सार्वजनिक बांधकाम विभागाकडून माहिती देण्यास टाळाटाळ केली जात आहे. स. जगदीपसिंघ मोहनसिंघ नंबरदार यांनी याप्रकरणी जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

नंबरदार यांनी १४ जुलै २०२६ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ६ (१) अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अर्ज दाखल केला होता. यामध्ये बाफना ते जुना मोंढा सिमेंट रस्त्याचे अंदाजपत्रक व कार्यारंभ आदेशाची सत्यप्रत, आजपर्यंत कंत्राटदाराला करण्यात आलेल्या देयकांची व संबंधित कामाची माहिती तसेच काम सुरू होण्यापूर्वी आणि काम पूर्ण झाल्यानंतर जीपीएस प्रणालीद्वारे घेण्यात आलेल्या छायाचित्रांची मागणी करण्यात आली होती. अर्ज दाखल करून एक महिन्यापेक्षा अधिक कालावधी उलटूनही माहिती मिळाली नसल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. जनमाहिती अधिकारी नवनाथ सोनटक्के यांच्याकडे वारंवार विचारणा केली असता, आज देतो, उद्या देतो, मी कामाच्या साईटवर आहे, अशी उत्तरे देऊन टाळाटाळ करण्यात आल्याचा दावा नंबरदार यांनी केला आहे. तसेच, संबंधित अधिकाऱ्यांकडून फोन बंद केला जात असल्याचेही तक्रारीत नमूद आहे.माहिती न मिळाल्याने नंबरदार यांनी २४ ऑगस्ट रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. संबंधित अधिकारी माहिती अधिकार कायद्याच्या तरतुदींकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून कंत्राटदाराला पाठीशी घालत असल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. दरम्यान, नांदेड परिसरात राष्ट्रीय महामार्गाच्या कामांमध्ये निकृष्ट कामामुळे सोनखेड व विष्णुपुरी येथे पूल कोसळल्याचा गंभीर आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. त्यामुळे बाफना-जुना मोंढा रस्त्याच्या कामाची पारदर्शक चौकशी करून संबंधित कागदपत्रे सार्वजनिक करावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.



एनटीसी उस्मानशाही मिल सुरु करावी या मागणीसाठी उस्मानशाही मिल हक्क संवर्धन समितीच्या वतीने निवासी जिल्हाधिकारी किरण अंबेकर यांना निवेदन देण्यात आले.यावेळी संयोजक तरण्णूम बेगम मोहमद, श्याम निलंगेकर, यशवंत थोरात, काकासाहेब डावरे, मंजू आडणे, वैशाली कऱ्हाळे, रुक्सना शेख सलमान आदी दिसत आहेत.

# एकही पात्र मतदार वंचित राहू नये यासाठी एसआयआर मोहिमेची जनजागृती करा-जिल्हाधिकारी

नांदेड/प्रतिनिधी-जिल्ह्यातील एकही पात्र मतदार मतदार यादीपासून वंचित राहू नये, यासाठी सर्व राजकीय पक्षांनी तसेच नागरिकांनी विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेची व्यापक जनजागृती करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले. विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रारूप मतदार यादी प्रसिद्धीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींची आढावा बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयात घेण्यात आली.

या बैठकीस अपर जिल्हाधिकारी रत्नदीप गायकवाड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते. भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार १ ऑक्टोबर या अर्हता दिनांकाच्या अनुषंगाने नांदेड जिल्ह्यात विशेष सखोल मतदार यादी पुनरिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघांची प्रारूप मतदार यादी ३१ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. ही यादी सर्व तहसील कार्यालये, उपविभागीय अधिकारी कार्यालये तसेच मतदान केंद्रांवर उपलब्ध करून देण्यात आली असून प्रारूप मतदार यादी तसेच अनुपस्थित, स्थलांतरित, मयत व दुबार मतदारांची (ASDD) यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या nanded.nic.in या जिल्हा संकेतस्थळावरही प्रसिद्ध करण्यात आली आहे. सर्व मतदारांनी प्रारूप मतदार यादीत आपले नाव, वय, पत्ता व इतर तपशील अचूक असल्याची खात्री करावी. मतदारांना voters.eci.gov.in किंवा ceo.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच वोटर हेल्पलाईन पद्वारे नाव तपासता येईल. याशिवाय १९५० या वोटर हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधून अथवा एसएमएसद्वारेही माहिती घेता येणार आहे. प्रारूप मतदार यादीबाबत ३१ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार असून त्यावर सुनावणी व निपटारा २९ ऑक्टोबर पर्यंत करण्यात येणार आहे. अंतिम मतदार यादी ४ नोव्हेंबर रोजी प्रसिद्ध होणार आहे.

# बहिणीच्या मृत्यूस जबाबदार असणाऱ्या डॉक्टर, कर्मचाऱ्यांवर कारवाईच्या मागणीसाठी भावाचा आत्मदहनाचा इशारा

नांदेड/प्रतिनिधी-डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, विष्णुपुरी येथे डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे बहिणीचा मृत्यू झाला आहे. संबंधित डॉक्टर व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा येत्या मराठवाडा मुक्ती संग्रामदिनी (१७ सप्टेंबर) रोजी आत्मदहन करण्याचा इशारा रातोळी (ता. नायगाव) येथील भाऊ बालाजी श्रावण गायकवाड यांनी जिल्हाधिकारी यांच्यासह संबंधीतांकडे देण्यात आलेल्या निवेदनात दिला आहे.

गायकवाड यांनी निवेदनात म्हटले आहे की, त्यांची बहीण शिल्पा भीमानंद वाघमारे (वय ३०) यांना १३ ऑगस्ट २०२६ रोजी कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेसाठी शासकीय रुग्णालयातील वॉर्ड क्रमांक १६ मध्ये दाखल करण्यात आले होते. १४ ऑगस्ट रोजी सकाळी चुकीचे इंजेक्शन दिल्यानेच एका मिनिटात शिल्पा वाघमारे यांच्या तोंडातून फेस आला. आणि पलंगावरुन ती जमिनीवर पडली. त्यानंतर उपस्थित डॉक्टरसह नर्स व आजुबाजूच्या नागरिकांनी तीला उचलून पलंगावर झोपवले. यावेळी डॉक्टरांनी तपासणी करुन माझ्या आईला इंजेक्शनाने काही होत नाही तुम्ही घाबरु नका, असे खोटे सांगून वेळ मारुन नेली. प्रकृती गंभीर झाल्यामुळे माझ्या बहिणीस वॉर्ड क्र.१९ मध्ये नेवून तीच्यावर उपचार चालू आहे असे खोटे सांगितले. त्यानंतर अंदाजे सकाळी ९ वाजण्याच्या दरम्यान कर्तव्यावरील डॉ.धुलेवाड यांच्यासोबत असलेल्या वैद्यकीय पथकाने माझ्या आईस व बहिणीस वॉर्डाबाहेर येवून तुमचे रुग्ण मयत झाला आहे अशी माहिती दिली. हा प्रकार कसा व कशामुळे झाला याची चौकशी करण्यासाठी रुग्णालयाचे मुख्य अधिष्ठाता डॉ.सुधीर देशमुख यांच्याकडे गेलो. यावेळी त्यांनी प्रत्यक्ष भेट देवून मयताचे शवविच्छेदन होवू द्या त्यानंतर आलेल्या अहवालानुसार पुढील कारवाई करण्याचे आश्वासन दिल्यामुळे दि.१५ ऑगस्ट रोजी दुपारी अंदाजे १.३० वाजण्याच्या सुमारास बहिण शिल्पा वाघमारे हिचे शवविच्छेदन करण्यात आले. या सर्व घटनाक्रमावरुन दि.१४ ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास वॉर्ड क्र.१६ व १९ या ठिकाणी कर्तव्यावर हजर डॉक्टर व स्टॉफ यांच्या निष्काळजीपणामुळे माझी बहिण शिल्पा वाघमारे मयत झाली आहे. यावरुन नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनला नोंद करण्यात आली. सदरील घटनेचा तपास ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक ज्ञानेश्वर भोसले यांच्याकडे देण्यात आला आहे. माझ्या बहिणीच्या मृत्यूस कारणीभूत असलेल्या दोषींवर कायदेशिर कार्यवाही करावी. अन्यथा मराठवाडा मुक्तीसंग्राम दिनी आत्मदहन करणार असल्याचा इशारा मयत शिल्पा वाघमारे यांचे बंधु बालाजी गायकवाड यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे.

# जिद्द,चिकाटी अन् मेहनतीतूनच यशाचे शिखर-वैजनाथ करपुडे

किनवट/प्रतिनिधी-विद्यार्थ्यांनी आयुष्यात जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण मेहनतीला आपले ध्येय मानून वाटचाल केली तरच यशाचे शिखर गाठणे सहज शक्य असते. आई-वडिलांनी मुलांच्या भवितव्यासाठी घेतलेल्या कष्टांची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी शिक्षणात प्रगती साधावी. आजचे युग हे स्पर्धेचे युग असून या स्पर्धेस न घाबरता आत्मविश्वासाने सामोरे गेले पाहिजे असे वैजनाथ करपुडे यांनी अध्यक्षीय समारोप प्रसंगी मार्गदर्शन केले.

मराठा सेवा संघ व सकल मराठा समाज यांच्या संयुक्त विद्यमाने समाजातील गुणवंत विद्यार्थी, कला व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंतांचा आणि शेतीनिष्ठ शेतकरी, उद्योजकांचा व डॉ. द्वारकाप्रसाद वायाळ यांचा सेवापूर्ती सत्कार सोहळा गजानन महाराज मंदिर संस्थान किनवटच्या सभागृहात ३० ऑगस्ट रोजी पार पडला. दरम्यान उपस्थितांना याच आशयावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले. संचालन व आभार बापुसाहेब तुप्पेकर तर प्रास्ताविक बाळकृष्ण कदम यांनी केले. वैजनाथ करपुडे, मारुती दिवसे, प्रा.उमाकांत इंगोले, माजी नगराध्यक्ष के.मूर्ती, जीएसटी सहायक आयुक्त दीपक शिरगुरवार, नगरसेवक प्रशांत कोरडे, प्रा.जयवंत चव्हाण, राजू शिंदे, संतोष डोंनगे आदी मान्यवर उपस्थित होते.

# गणेशोत्सवासाठी अधिकृत वीज जोडणी घ्या:महावितरणचे गणेश मंडळांना आवाहन

नांदेड/प्रतिनिधी- यंदाच्या गणेशोत्सव निर्विघ्न आणि सुरक्षित वातावरणात साजरा करण्यासाठी सर्व गणेशोत्सव मंडळांनी वीज सुरक्षेची योग्य ती खबरदारी घ्यावी, तसेच उत्सव कालावधीत केवळ अधिकृत वीज जोडणीच (वीज कनेक्शन) घ्यावी, असे अवाहन महावितरणकडून करण्यात आले आहे. उत्सवाच्या काळात कोणतीही अप्रिय घटना अथवा दुर्घटना घडू नये याची खबरदारी घ्यावी. श्रीगणेश आगमन आणि विसर्जन मिरवणूकी दरम्यान रस्ते तसेच गल्ली-बोळांतील विजेच्या तारांची (वीजवाहिन्या) उंची लक्षात घेऊनच गणेशमुर्तीची उंची व रथाची रचना निश्चित करावी. त्याच प्रमाणे मंडप आणि रोषणाईसाठी वीज संचाची मांडणी करताना सुरक्षेच्या नियमांचे पालन केले जावे. अपघात टाळण्यासाठी केवळ प्रमाणित आणि कुशल विजेच्या ठेकेदारांकडूनच हे काम करून घ्यावे. गणेश मंडळांसाठी वीज जोडणी घेण्याची प्रक्रिया महावितरणने अत्यंत सोपी केली आहे. मंडळांना महावितरणच्या अधिकृत मोबाईल ॲप किंवा ऑनलाईन संकेतस्थळावरून अर्ज करून त्वरित तात्पुरती वीज जोडणी मिळवता येणार आहे. सार्वजनिक सुरक्षेचा विचार करता कोणत्याही मंडळाने अनधिकृतपणे वापर करू नये, तसेच विजेच्या तारा किंवा खांबांजवळ मंडप उभारताना पुरेशी काळजी घ्यावी, असेही महावितरणने स्पष्ट केले आहे.

# चिमुकल्या हृदयच्या उपचारासाठी माहूरकरांचा मदतीचा हात

## गणपती मंडळाच्या सदस्यांची मदतफेरी;१० कोटींच्या इंजेक्शनसाठी मदतीचे आवाहन

माहूर/प्रतिनिधी-दुर्मिळ आणि गंभीर आजाराशी झुंज देत असलेल्या हृदय अक्षय दरेकर या चिमुकल्याच्या उपचारासाठी माहूरकरांनी माणुसकीचा हात पुढे केला आहे. हृदयच्या उपचारासाठी आवश्यक असलेल्या जीवनरक्षक इंजेक्शनची किंमत तब्बल १० कोटी रुपये असल्याने एवढी मोठी रक्कम उभी करण्याचे आव्हान दरेकर कुटुंबीयांसमोर उभे ठाकले आहे.

हृदयच्या उपचारासाठी आर्थिक मदत उभी करण्याच्या उद्देशाने माहूर शहरातील गणपती मंडळाच्या सदस्यांनी दि. १ सप्टेंबर रोजी व्यापारी पेठेत मदतफेरी काढली. या फेरीदरम्यान व्यापारी, दुकानदार तसेच नागरिकांना हृदयच्या उपचाराची माहिती देत आर्थिक मदतीचे आवाहन करण्यात आले. नागरिकांनीही या आवाहनाला प्रतिसाद देत आपल्या क्षमतेनुसार मदतीचा हात पुढे केला.अल्पवयातच गंभीर आजाराशी सामना करणाऱ्या हृदयच्या उपचारासाठी मोठ्या आर्थिक मदतीची गरज आहे. त्याच्या उपचारासाठी आवश्यक असलेले महागडे इंजेक्शन मिळणे ही कुटुंबीयांसाठी जीवन-मरणाची लढाई ठरत आहे. त्यामुळे समाजातील



दानशूर व्यक्ती, सामाजिक संस्था, व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिकांनी पुढे येऊन शक्य ती आर्थिक मदत करावी, असे आवाहन दरेकर कुटुंबीयांनी केले आहे.

# मानव विकास विद्यालयात वृक्षबंधन;वृक्ष संरक्षणाची घेतली शपथ

देगलूर/प्रतिनिधी-राष्ट्रीय हरित सेना आणि एनसीसीविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक मानव्य विकास विद्यालयात वृक्षबंधन महोत्सव साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी झाडांना राखी बांधून वृक्षबंधन साजरे केले. या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून शाळेच्या प्रांगणातील ६३ वर्षीय पिंपळाच्या वृक्षाला राखी बांधली आणि पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली.

भारतीय संस्कृतीत पिंपळाला एक दैवी वृक्ष मानले जाते हे सर्वज्ञात आहे. पिंपळाच्या आध्यात्मिक प्रभावाचा स्पर्श चेतनेला ऊर्जा आणि चैतन्य देतो. स्कँद पुराणात असे म्हटले आहे की, विष्णू पिंपळाच्या मुळांमध्ये, केशव खोडात, नारायण फांद्यांमध्ये, श्रीहरी पानांमध्ये आणि सर्व देव फळांमध्ये वास करतात. शिवाय, भगवान गौतम बुद्धांनी पिंपळाच्या झाडाखाली ध्यान करून दिव्य ज्ञानप्राप्ती केली, म्हणूनच या झाडाला बोधीवृक्ष असेही म्हटले जाते. याच कारणास्तव, दरवर्षी शाळेतील विद्यार्थी पिंपळाच्या झाडाला राखी बांधतात आणि त्याचे तसेच पर्यावरणाचे रक्षण करण्याची शपथ घेतात. राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी ही राखी स्वतः तयार केली. राखीवर झाडे लावा, झाडे वाचवा, झाडे आपले मित्र आहेत, झाडांचे रक्षण करा, आणि पर्यावरणाचे रक्षण करा अशा विविध अर्थपूर्ण घोषणा लिहिल्या होत्या. राखी आणि त्यावरील घोषणांनी सर्वांचे लक्ष वेधून घेतले. शाळेचे प्राचार्य संतोष कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली, राष्ट्रीय हरित सेना विभाग आणि एनसीसी विभागाने शाळेच्या परिसरात मोठ्या संख्येने झाडे लावली आहेत आणि त्यांचे संरक्षण केले आहे. दरवर्षी, विद्यार्थी शाळेतील विविध भारतीय झाडांना राखी बांधून वृक्षबंधन साजरे करतात. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करणे हा या कार्यक्रमामागील उद्देश आहे. या कार्यक्रमाच्या निमित्ताने उपप्राचार्य श्याम कोल्हे, पर्यवेक्षक शरद हान्द्रे, शिक्षक प्रतिनिधी संजय कल्याणी, विशेष शिक्षक मोतीलाल साबणे, गोविंद पवार, राजेश्वर पुलगमवार, मनोज मोरे, प्रशांत गायकवाड, विकास माने, राम कडलवार इत्यादी उपस्थित होते.राष्ट्रीय हरित सेनेचे अध्यक्ष शिवानंद स्वामी, एनसीसी विभाग प्रमुख गिरीश पारसेवार इत्यादींनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# सोन्याच्या बिस्किटाचे आमिष दाखवून महिलेचे दागिने केले लंपास

धर्माबाद/प्रतिनिधी-धर्माबाद शहरात गुन्हेगारांचे प्रमाण वाढत चालले आहे. सोमवार दि.३१ ऑगस्ट रोजी दुपारी भरदिवसा एका महिलेला पितळी सोन्याच्या बिस्किटाचे आमिष दाखवून तिचे लाखो रुपयांचे दागिने लंपास केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे.

दि.३१ ऑगस्ट रोजी दुपारी मंगला मोहनराव कोंडावार पीडित महिला धर्माबाद येथील पटेल नगर येथे घरी जात असताना कॉलेज रोड रस्त्यावरून जात असताना साक्षी बुक समोर अज्ञात भामट्यांनी त्यांना गाठले. आम्हाला रस्त्यात सोन्याचे बिस्किट सापडले आहे, ते कमी किमतीत घ्या किंव्रा हे बिस्किट तुमच्याकडे ठेवा आणि तुमची सोनसाखळी आम्हाला द्या असे खोटे आमिष चोरट्यांनी महिलेला दाखवले. बोलण्याच्या ओघात आणि स्वस्त सोन्याच्या जाळ्यात अडकवून भामट्यांनी त्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे दागिने अत्यंत शिताफीने लंपास केले. महिला सोन्याचे बिस्किट घेऊन घरी गेली व आपल्या मुलला ते सोन्याचे बिस्किट दाखवलं मुलगा लगेच ते घेऊन सोनाराकडे गेले असता ते पितळेचे असल्याचे निष्पन्न झाले. भरदुपारी गजबजलेल्या भागात अशी घटना घडल्याने महिला वर्गात प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी धर्माबाद पोलीस ठाणे परिसरातील पोलीस गस्त वाढवण्याची मागणी केली आहे. पोलिसांनी परिसरातील व्यावसायिक गाळे आणि मुख्य चौकांमधील सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपींचा शोध सुरू केला आहे.

# देगलूर तालुक्यात जलजीवन कोरडेच;निधी खर्च,कामे मात्र कागदावर!

## १५० कोटींच्या योजनेला कंत्राटदार-अधिकाऱ्यांच्या संथ कारभाराचा फटका;ग्रामस्थांचा संताप

देगलूर/प्रतिनिधी-ग्रामीण भागातील पाणीटंचाई कायमस्वरूपी दूर करून प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे पाणी पोहोचविण्याच्या उद्देशाने केंद्र व राज्य शासनाच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या जलजीवन मिशनला देगलूर तालुक्यातच घरघर लागल्याचे चित्र आहे. तालुक्यातील १०८ गावांसाठी हर घर नळ योजनेअंतर्गत तब्बल १५० कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी मंजूर करण्यात आला. मात्र, गेल्या दोन-तीन वर्षांपासून कामे सुरू असूनही अनेक गावांमध्ये अद्याप नळाचे पाणी पोहोचलेले नाही. कोट्यवधींचा निधी खर्च झाल्याचा दावा होत असताना प्रत्यक्षात कामांची अवस्था अर्धवट आणि निकृष्ट असल्याने निधी नेमका कुठे खर्च झाला? असा सवाल टंचाईग्रस्त गावांतील नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

देगलूर तालुक्यातील १०८ गावांमध्ये जलजीवन मिशनच्या माध्यमातून पाणीपुरवठा व्यवस्था उभारण्याचे नियोजन करण्यात आले. त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात आला. मात्र, अनेक गावांमध्ये पाईपलाईन, जलकुंभ, विहीर व इतर कामे संथगतीने सुरू आहेत. काही ठिकाणी कामे सुरू करून ती अर्धवट अवस्थेत सोडण्यात आली आहेत. त्यामुळे शासनाच्या महत्त्वाकांक्षी योजनेचा उद्देशच धुळीस मिळत असल्याचे चित्र आहे.विशेष म्हणजे, काही गावांमध्ये पाईपलाईन टाकण्यात आली असली तरी अद्याप नियमित पाणीपुरवठा सुरू झालेला नाही. काही ठिकाणी जलकुंभ उभारण्यात आले असले तरी त्याचा प्रत्यक्ष वापर होत नसल्याची ग्रामस्थांची तक्रार आहे. पाणीपुरवठ्याच्या स्रोतांची उपलब्धता, पाइपलाइनची गुणवत्ता, वीज जोडणी आणि इतर आवश्यक बाबींचे योग्य नियोजन न झाल्याने अनेक योजना केवळ कागदोपत्री पूर्ण झाल्याचे दाखविण्याचा प्रकार तर होत नाही ना, असा संशयही व्यक्त केला जात आहे. जलजीवन मिशनचा मुख्य उद्देश प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला पुरेसे आणि नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे हा आहे. मात्र, योजना पूर्ण झाल्याचे कागदोपत्री दाखवून प्रत्यक्षात नळाला पाणीच येत नसेल तर या योजनेच्या अंमलबजावणीवरच प्रश्नचिन्ह निर्माण होते. नळ जोडणी झाली म्हणजे पाणीपुरवठा झाला, असे प्रशासनाने समजू नये, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.गावोगावी उन्हाळ्यात पाणीटंचाई तीव्र होत असताना शासनाकडून कोट्यवधी रुपये खर्च करूनही नागरिकांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत असेल, तर या योजनेच्या नियोजनापासून ते अंमलबजावणी पर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेची चौकशी करण्याची गरज आहे. कामांची गुणवत्ता, प्रत्यक्ष खर्च, ठेकेदारांना करण्यात आलेली देयके, कामांची मोजमाप पुस्तके आणि पूर्णत्वाची प्रमाणपत्रे यांची तपासणी झाल्यास वस्तुस्थिती समोर येऊ शकते. दरम्यान, अनेक गावांतील ग्रामस्थांनी संबंधित अधिकारी व कंत्राटदारांकडे वारंवार तक्रारी करूनही कामांना अपेक्षित गती मिळत नसल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे १५० कोटींच्या या योजनेत नेमकी किती कामे पूर्ण झाली, किती कामे प्रलंबित आहेत आणि किती निधी प्रत्यक्ष खर्च झाला, याचा गावनिहाय तपशील प्रशासनाने सार्वजनिक करावा, अशी मागणी जोर धरत आहे. शासनाचा पैसा हा जनतेचा पैसा आहे. त्यामुळे कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होत असताना त्याचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणे अपेक्षित आहे. कागदावर योजना पूर्ण आणि प्रत्यक्षात ग्रामस्थांच्या घरातील नळ कोरडे, अशी परिस्थिती निर्माण होत असेल तर संबंधितांवर जबाबदारी निश्चित होणे आवश्यक आहे. जलजीवन मिशनला जल मिळणार कधी आणि देगलूर तालुक्यातील ग्रामस्थांच्या नळाला प्रत्यक्ष पाणी येणार कधी? हा प्रश्न आता प्रशासनाने गांभीर्याने घेण्याची वेळ आली आहे.

# कर्मचाऱ्यांच्या संपामुळे बँक व्यवहार ठप्पची शक्यता

मुंबई/प्रतिनिधी-पाच दिवसांचा कामकाजाचा आठवडा लागू करावा, कामगिरीशी निगडित प्रोत्साहन योजना मागे घ्यावी आणि प्रलंबित मागण्यांवर तोडगा काढावा, या मागण्यांसाठी युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सने देशव्यापी संपाची घोषणा केली आहे. त्यानुसार ११ सप्टेंबरला एकदिवसीय संप, तर २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान तीन दिवसांचा संप करण्यात येणार आहे. मागण्या मान्य न झाल्यास २६ ऑक्टोबरपासून बेमुदत संप पुकारण्याचा इशारा संघटनांनी दिला आहे.

पाच दिवसांचा कामकाजाचा आठवडा लागू करण्याची मागणी अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. बँक कर्मचाऱ्यांनी सोमवार ते शुक्रवार अतिरिक्त ४० मिनिटे काम करण्याची तयारी दर्शविल्याचे संघटनांचे म्हणणे आहे. या मागणीची शिफारस अर्थ मंत्रालयाकडे पाठविण्यात आली असली तरी अद्याप मंजुरी मिळालेली नाही. सरकारच्या सुधारित कामगिरीशी निगडित प्रोत्साहन योजनेलाही संघटनांचा विरोध आहे. दरम्यान, संपामुळे सप्टेंबर आणि ऑक्टोबरमध्ये बँकिंग व्यवहारांवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

# अ.भा.मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदी शिवराज काटकर




सांगली:अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ पत्रकार, संपादक व लेखक शिवराज काटकर यांची निवड झाली. सांगली येथे झालेल्या भव्य सोहळ्यात त्यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली. यावेळी राज्यभरातून मोठ्या संख्येने पत्रकार व पदाधिकारी उपस्थित होते.

पत्रकारांच्या हक्कांसाठी सातत्याने लढणारे काटकर यांच्यावर आता परिषदेची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. सांगली जिल्ह्याला प्रथमच परिषदेचे अध्यक्षपद मिळाल्याने जिल्ह्यातील पत्रकारांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.आचार्य अत्रे, पा. वा. गाडगीळ, अनंत भालेराव यांसारख्या दिग्गज पत्रकारांनी भूषविलेल्या अध्यक्षपदाच्या गौरवशाली परंपरेत आता शिवराज काटकर यांच्या नावाची भर पडली आहे. पत्रकारांच्या प्रश्नांसाठी आंदोलने, प्रशिक्षण शिबिरे आणि संघटनात्मक उपक्रमांत त्यांचा सातत्याने सहभाग राहिला आहे.अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांच्या हस्ते काटकर यांचा सत्कार करण्यात आला.

# पेपरफुटी प्रकरणातील आरोप बिनबुडाचे-विवेक भीमनराव

मुंबई/प्रतिनिधी- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या औषध निरीक्षक परीक्षेचा पेपरफुटी प्रकरणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आ.रोहित पवार यांनी आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनराव यांच्या राजीनाम्याची मागणी केल्यानंतर भीमनराव यांनी खुले पत्र प्रसिद्ध करून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. प्रश्नपत्रिका फुटीची घटना आपल्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळापूर्वी घडल्याचे सांगत त्यांनी आपल्यावरील वैयक्तिक आरोपांवर तीव्र नाराजी व्यक्त केली.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) औषध निरीक्षक भरती परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटीप्रकरणी आरोप-प्रत्यारोपांना वेग आला आहे. प्रश्नपत्रिका फुटीची घटना जानेवारी २०२६ मध्ये घडली. त्यानंतर आपण १८ फेब्रुवारी २०२६ रोजी एमपीएससीच्या अध्यक्षपदाची शपथ घेतली आणि ३ मार्च रोजी पदभार स्वीकारला, याकडे भीमनराव यांनी लक्ष वेधले. त्यामुळे या घटनेशी संबंधित वैयक्तिक आरोप करताना वस्तुस्थिती आणि अधिकृत नोंदींचा विचार करावा, असे त्यांनी स्पष्ट केले.या प्रकरणाची आयोगाने गंभीर दखल घेत तक्रार दाखल केली असून, पोलिसांकडून तपास सुरू आहे. भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक आणि सुरक्षाविषयक उपाययोजना सुचविण्याकरिता आयोगाने उच्चस्तरीय अंतर्गत समिती स्थापन केली आहे. परीक्षा प्रक्रियेत आवश्यक सुधारणा करण्यासाठी राज्य शासनानेही उच्चस्तरीय समिती गठित केल्याचे भीमनराव यांनी पत्रात नमूद केले.अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यापासून परीक्षा आणि भरती प्रक्रियेची विश्वासार्हता, पारदर्शकता, कार्यक्षमता तसेच सुरक्षा अधिक बळकट करण्यावर भर दिल्याचा दावा त्यांनी केला. वाढत्या भरती प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर परीक्षा यंत्रणा अधिक सक्षम आणि सुरक्षित करण्यासाठी विविध सुधारणा हाती घेतल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.एमपीएससीच्या अध्यक्षपदावर असताना आयोगाची निष्पक्षता, विश्वासार्हता आणि उच्च मूल्ये जपणे, तसेच लाखो उमेदवारांना न्याय्य व समान संधी उपलब्ध करून देणे ही आपली घटनात्मक जबाबदारी आहे. ही जबाबदारी पूर्ण पारदर्शकता आणि सचोटीने पार पाडण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे भीमनराव यांनी म्हटले आहे.

# वाजेगाव ते बाफना टी-पॉइंट पुलाच्या कामाचा महापौरांनी घेतला आढावा



नांदेड/प्रतिनिधी-समृद्धी महामार्ग प्रकल्पांतर्गत नांदेड शहरात तयार होत असलेल्या वाजेगाव ते बाफना टी-पॉइंट दरम्यानच्या पुलाच्या कामाचा सविस्तर आढावा घेण्यासाठी महानगरपालिकेत आज (बुधवार) महापौर सौ.कविता संतोष मुळे यांच्या अध्यक्षतेखाली एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली.

वाजेगाव ते बाफना टी-पॉइंट दरम्यान होणारा हा पूल शहराच्या दळणवळणाच्या आणि भविष्यातील वाहतुकीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प आहे. मात्र, या पुलाचे प्रत्यक्ष बांधकाम सुरू असताना स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांना कोणत्याही अडचणींचा सामना करावा लागू नये, यासाठी प्रशासकीय पातळीवर पूर्वतयारी करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर महापौरांनी पुढाकार घेत या विशेष बैठकीचे आयोजन केले होते. बैठकी दरम्यान पुलाच्या बांधकाम क्षेत्रात सुरक्षेच्या दृष्टीने करावयाच्या उपाययोजनांवर प्रामुख्याने भर देण्यात आला. काम सुरू असताना रस्त्यावरील वाहतूक सुरळीत राहण्यासाठी योग्य पर्यायी मार्गांचे नियोजन करावे, अपघात टाळण्यासाठी बांधकाम परिसरात आवश्यक ते दिशादर्शक फलक व बॅरिकेड्स लावण्यात यावेत, तसेच रात्रीच्या वेळी वाहनधारकांना स्पष्ट दिसेल अशी प्रकाश व्यवस्था चोख ठेवण्यात यावी, अशा सूचना महापौरांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. यासोबतच बांधकामामुळे उडणाऱ्या धुळीचा त्रास नागरिकांना होऊ नये यासाठी दक्षता घेण्याचे निर्देशही देण्यात आले.या महत्त्वपूर्ण आढावा बैठकीस उपमहापौर दिपकसिंह रावत, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त स.अजितपालसिंघ संधु, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता रामदास खलसे, कंत्राटदार कंपनीचे प्रोजेक्ट मॅनेजर लॅवेंडर सिंग सिरोही, अथॉरिटी इंजिनियर देशमाने, महानगरपालिकेचे नगरसेवक मो.मसुद अहेमद खान, अ.लतीफ अ.माजीद, सुमित मुथा, मो.नासेर अहेमद आणि संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत उपस्थित नगरसेवकांनी बांधकाम परिसरात नागरिकांना येणाऱ्या संभाव्य अडचणी मांडल्या. एमएस-आरडीसीच्या अधिकाऱ्यांनी पुलाच्या कामाच्या सद्यस्थितीची आणि प्रगतीची माहिती सादर करत, लोकप्रतिनिधींनी सुचवलेल्या सर्व सुरक्षात्मक उपाय योजनांची आणि खबरदारीची काटेकोर अंमलबजावणी केली जाईल, अशी ग्वाही दिली.

# युवा डॉक्टर मृत्यू प्रकरणी नातेवाईकांचा संतापाचा उद्रेक

सातारा:वरिष्ठांच्या कथित मानसिक त्रासाला कंटाळून त्यांनी जीवन संपविल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. या प्रकरणात काही वरिष्ठ अधिकाऱ्यांसह माजी मंत्री तानाजी सावंत यांचे ओएसडी देशमुख यांचे नाव चर्चेत आल्याने सखोल चौकशीची मागणी होत आहे.या प्रकरणी दोषींविरुध्द कठोर कार्यवाही झाल्याशिवाय युवा डॉक्टरचा मृतदेह स्वीकारणार नाही अशी ठाम भूमीका मयताच्या नातेवाईकांनी घेतली आहे.

फलटण उपजिल्हा रुग्णालयातील २७ वर्षीय युवा डॉ.राजेंद्र जगन्नाथ रुपनवर यांच्या मृत्यूने खळबळ उडाली आहे. वरिष्ठांच्या कथीत मानसिक त्रासाला कंटाळून रुपनवर यांनी आत्महत्या केली होती. त्यांच्यावर मुंबईतील रुग्णालयात उपचार सुरु होते. काल त्यांचा मृत्यू झाला. आज बुधवारी राजेंद्र यांचा मृतदेह मुंबईहून फलटणला आणण्यात आला. यावेळी शेकडो नागरिकांनी उपजिल्हा रुग्णालयासमोर गर्दी केली. संतप्त नातेवाईक आणि रुग्णालय प्रशासनामध्ये बाचाबाची झाली. दोषींवर कारवाई होईपर्यंत पार्थिव स्वीकारणार नाही, असा आक्रमक पवित्रा कुटुंबीयांनी घेतला.राजेंद्र यांनी शेअर केलेल्या व्हिडिओमध्ये अनेक व्यक्तींची नावे असल्याचा दावा केला जात असताना आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या गुन्ह्यात केवळ वैद्यकीय अधिकारी लीला मदने यांचे नाव असल्याने पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. हा गुन्हा फलटण पोलिसांकडे वर्ग करण्यात आला असून पुढील तपास त्यांच्याकडून केला जाणार आहे.अत्यंत कष्टाने मुलगा डॉक्टर झाला; वरिष्ठांच्या त्रासाने त्याचे आयुष्य उद्ध्वस्त झाले, असा आक्रोश नातेवाईकांनी केला.

## जिल्हाधिकारी कार्यालयात मंगळवारी पेन्शन अदालत

नांदेड/प्रतिनिधी- शासनाच्या सूचनेनुसार सप्टेंबर महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी, दि. ८ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे पेन्शन अदालत आयोजित करण्यात आली आहे.

नांदेड जिल्ह्यातील महसूल विभागातून सेवानिवृत्त झालेले अधिकारी व कर्मचारी यांच्या पेन्शनसंदर्भातील तसेच अन्य अडचणींचे निवारण करण्याच्या उद्देशाने या पेन्शन अदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. संबंधित सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दि.८ सप्टेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी १.३० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे उपस्थित राहून आपल्या तक्रारींचे निवेदन सादर करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी, नांदेड यांनी केले आहे.

## वेलनेस स्पा सेंटरवर...

पान १ वरुन

पाठविण्यात आले. संबंधीत ग्राहकाकडे नोटांच्या क्रमांकाची नोंद घेवून चार हजार रुपये देण्यात आले होते. सदरील बनावट ग्राहकाने स्पा सेंटरमध्ये प्रवेश करुन मॅनेजरशी चर्चा केली. दोघांमधील संवाद झाल्यानंतर ग्राहकाने पोलीस अधिकाऱ्यांच्या मोबाईलवर मिस्ड कॉल द्वारे इशारा दिला. पोलीसांचे पथक काही क्षणातच वेलनेस स्पा सेंटरमध्ये दाखल झाले. स्पा सेंटरमध्ये मसाजच्या नावाखाली कुंटनखाना सुरु असल्याचे आढळून आले. पोलीसांनी नेपाळ, नागालँड, नवी दिल्ली, ठाणे व पुणे येथील सात महिलांची सुटका करण्यात आली. स्पा सेंटरचे व्यवस्थापन करणारे व महिलांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून देहव्यापार करुन घेणारे स्पा सेंटरचे मॅनेजर हिफजूर रहेमान आरिफ उद्दीन (वय २०), रहाज उद्दीन रफीक उद्दीन (वय २०), याहीया अहेमद अब्दुल वहीद (वय १९) तीघे रा.होजाई, नगांव (आसाम) यांना अटक केली आहे. पोलीसांनी स्पा सेंटर मधून १ लाख ७१ हजार रुपयांचा ऐवज जप्त केला. वेलनेस स्पा सेंटरचे मालक संतोष बघे हा फरार झाला आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात चार जणांविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत फौजदार अश्वीनी गायकवाड, पोलीस शिपाई रितेश कुलते, गणेश लोसरवार, ज्ञानोबा कौठेकर, यशोदा केंद्रे हे सहभागी झाले होते.

## पो.नि.गणेश कराड यांची...

लक्षात घेता वरिष्ठांच्या आदेशानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी कदम यांनी वेळीच फटाफट निर्णय घेऊन वातावरण निवळवले. प्रसंगावधान राखत पोलीसी कुमक बोलावली होती. दरम्यान दुसऱ्या बाजूने नांदेड जि.प.च्या माजी अध्यक्षा जनाबाई डुडूळे, प्रा.विजय खुपसे, प्रा.किशन मिराशे, विद्यार्थीनेते विकास कुडमते, शेषराव कोवे, जितेंद्र कुलसंगे आदि दिग्गज मान्यवरांचे शिष्टमंडळानेही भूमिका जाहीर केल्याने आणि प्रकरणातील तिव्रता पहाता प्रशासनानेही तेवढ्याच तत्परतेने प्रकरण हाताळले हे विशेष म्हणता येईल. किनवट पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक जगदीश मंडलवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

## डॉ.राम वाघमारे यांच्या पुस्तकाचे शुक्रवारी प्रकाशन

नांदेड/प्रतिनिधी-इसाप प्रकाशन आणि श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बिजूर (ता.बिलोली) यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ.राम वाघमारे लिखित थाडेसे भारताबाहेर या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा ४ सप्टेंबर रोजी सायं.५ वा. शासकीय विश्रामगृह, नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे.

# विविध मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते गंगाधर गट्टूवार यांचा आत्मदहनाचा इशारा

कुंडलवाडी/प्रतिनिधी-शहरातील नव्याने बांधण्यात आलेले ग्रामीण रुग्णालय व बसस्थानकाच्या इमारतींचे तातडीने उद्घाटन करून नागरिकांच्या सेवेसाठी खुले करावेत, यासह विविध प्रलंबित मागण्यांसाठी सामाजिक कार्यकर्ते गंगाधर गट्टूवार यांनी दि.२ ऑक्टोबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे.

यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कुंडलवाडी व परिसराच्या विकासासाठी विविध मागण्या करण्यात आल्या आहेत. कुंडलवाडी येथे औद्योगिक वसाहत मंजूर करून शहर व परिसरातील बेरोजगार युवक तसेच गोरगरिबांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात, मुक्रमाबाद परिसरातील लेंडी धरणाचे पाणी बिलोली तालुक्यातील शेतीसाठी उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करावी, तेलंगणातील बोधन तसेच जिल्ह्यातील नागणी मार्गे कुंडलवाडी, आरळी, दुगाव, कुंटूर या मार्गाचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्यात यावे, नागणी येथील मांजरा नदीवरील पूल आकाराने लहान असल्याने या ठिकाणी मोठ्या पुलाच्या बांधकामास शासनाने मंजुरी द्यावी, शहरात नवीन ग्रामीण रुग्णालयाची इमारत बांधून पूर्ण झाली असतानाही तिचे उद्घाटन अद्याप करण्यात आले नाही. व इतर मागण्यांसाठी गंगाधर गट्टूवार यांनी आत्मदहनाचा इशारा दिला आहे.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग अ‍ॅण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४